33

ब-१ निविदा स्विकारल्यानंतर ठेकेदारांकडून वाहतुक अंतर व उंचावरील कामांसाठी मागण्यांत येणा-या अतिरिक्त जादा बाबीं बाबत

## परीपत्रक

संदर्भ :- अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे व सदस्य राज्यस्तरीय बांधकाम निविदा समिती यांचे पत्र जा.क्रमांक
अधिक्षक अभियंता सा.बांधकाम मंडळ,पुणे, जा.क्र.पोबी/१७२९ दि. ६.३.९७.

महाराष्ट्र राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना विविध प्रकारची स्थापत्य बांधकामें करावी लागतात. यासाठी सदर कामांसाठी या कार्यालयाच्या आर्थिक व प्रशासकीय तसेच तांत्रिक मंजू-या घेतल्यानंतर कारखान्याने रीतसर या कामांच्या जाहीर निविदेव्दारे ब-१ निविदा पत्रकांमध्ये सार्वजनिक बांधकाम खात्याकडे पंजीबध्द असलेल्या ठेकेदारांकडून निविदा मागविणे आवश्यक आहे. यानंतर कामांच्या किंमती-नुसार सदर कामांच्या निविदा कारखाना पातळीवर वा राज्यस्तरीय बांधकाम निविदा समितीसमोर उघडण्यांत येवून व आवश्यक त्या वाटाघाटीनंतर ठेकेदार मुकर केले जातात. त्याप्रमाणे कारखाना ठेकेदारांना करारनामा करून काम करण्याचे आदेश देत असतो.

वास्तवीक ब-१ निविदा शर्तीप्रमाणे व सार्वजनिक बांधकाम खात्याच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे सदर निविदा भरतांनाच सदर ठेकेदारांनी सदर कामांच्या बाबतीत भौगोलीक परीस्थिती, तसेच बांधकाम साहित्याची, मजूरांची उपलब्धता तसेच सदर कामांचे स्वरुप व निविदेतील दर व प्रमाण या विषयी योग्य तो अभ्यास करुनच निविदेतील त्यांची टक्केवारी भरलेली असते. एकदा निविदा स्विकारल्यानंतर व काम करण्याचे आदेश दिल्यानंतर या टक्केवारीत वा सदर कामाच्या अंदाजपत्रकानुसार कोणत्याही जादा बाबींची मागणी करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

आता असे निदर्शनांस येत आहे की ब-याच वेळेस काम अंतिम स्थीतीत असतांना वा पूर्ण झालेली असल्यानंतर ठेकेदारांकडून विविध बाबींसाठी लांबवरचे वाहतुक अंतर दाखवून त्यासाठी अतिरिक्त वाहतुकीसाठी जादा बाब, तसेच काही बाबतीत उंचीवरील कामांसाठी अतिरीक्त जादा बाबींची मागणी केली जाते व कारखाना व त्यांचे स्थापत्य विषारद निविदा शर्तींची वा नियमांची सांगड न घालता असे प्रस्ताव या कार्यालयांत सादर करतात. सदरहू बाब पूर्णपणे चुकीची असून नियमबाह्य आहे. याबाबत अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे यांचे मत वरील संदर्भान्वये पण विचारात घेतले आहे. यापुढे एकदा ठेकेदारांनी निविदेत त्यांची अंतिम टक्केवारी दिल्यानंतर व त्यांना काम करण्याचे आदेश जारी केल्यानंतर वाहतुक अंतरासाठी व उंचावरील कामांसाठी किंवा अंदाजपत्रकांत विचारांत न घेतलेल्या तत्सम बाबीं उदाहरणार्थ साखर कारखाना परीसर किंवा डोंगराळ भागासाठी इत्यादि किरता कोणत्याही प्रकारच्या जादा बाबींचा वा भाववाढीचा प्रस्ताव या कार्यालयांत पाठविण्यांत येवूं नये. या सर्व बाबीं फक्त निविदा स्विकारण्यासाठी तुलना करण्यासाठी उपयुक्त ठरत असतात व अशा प्रकारचा अनावश्यक पत्रव्यवहार टाळावा व भविष्यात अशा प्रस्तावांची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेण्यांत यावी ही विनंती. तसेच वरील बाबींसाठी जादा बाब म्हणून कारखान्याकडून

17

तसेच या कार्यालयाच्या असेही निदर्शनास येत आहे की कठीण दगडात खोदाई केल्यानंतर त्या दगडांचा वापर सदर कामांवर दाखविला जात नाही. तरी या बाबत खोदकामातून निघणा-या कठीण दगडाची वसुली त्या त्या दरसुची प्रमाणे ठेकेदारांच्या देयकांमधून करण्याची दक्षता घ्यावी किंवा सदर उपयुक्त दगड ठेकेदारांकच्याकडून निविदा बाबी प्रमाणे कट्टे लावून घेऊन इतर कामांवर उपयोगांत आणावा व तशा नोंदी ठेवण्यांत याव्यात.

वरील बाबींच्या बाबतीत कांही अनियमितता दिसून आली तर त्या बाबतीत कार्यकारी संचालक व संचालक मंडळ जबाबदार राहील व त्या बाबत कठोर कार्यवाही करण्यांत येईल त्याचबरोबर स्थापत्य विषारद यांना-ही सदर सूचनांचे पालन करणे या कार्यालयाच्या पॅनलवर राहण्यासाठी बंधनकारक राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

सही/- [illegible]
साखर आयुक्त
महाराष्ट्र राज्य, पुणे-४२.

[१२७१]

जा. क्र. साआ/क-१५/राज्यनिबांधकाम/९७
साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४२.
दिनांक: ६-३-९७.

प्रति,

१] अधिक्षक अभियंता व सदस्य राज्यस्तरीय निविदा बांधकाम समिती, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सेंट्रल बिल्डींग, पुणे-१ यांना माहितीसाठी सस्नेह रवाना.

२] मा. कार्यकारी संचालक,
........................सहकारी साखर कारखाना मर्या. [सर्व]
पोस्ट                    ता.                    जिल्हा.

३] संबंधीत सर्व स्थापत्य विषारद यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी सस्नेह रवाना.

४] प्रादेशिक सहसंचालक [साखर] सर्व, यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना.

५] सहनिबंधक लेखा परीक्षण [साखर] यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना.

६] विशेष लेखा परीक्षक [साखर] सहकारी संस्था [सर्व]

**प्रति,**
**१] विशेष लेखा परीक्षक, वर्ग-१ सहकारी सा संस्था [साखर] पुणे.**
**२] द्वितीय विशेष लेखा परीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था [साखर] पुणे.**
**६१८, सदाशिव पेठ, हरिहर निवास, बाजीराव रोड,**
**विश्राम बागवाड्या जवळ, पुणे-४११०३०.**

15 III 97